# भारतातील विद्यार्थी संघटनेची वाटचाल

**शिवाली संजय पोवार** संशोधक विद्यार्थीनी राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

......................................................................................................................................

**प्रस्तावना**

भारताच्या इतिहासात स्वातंत्र्यपूर्व काळापासून विद्यार्थी संघटना काम करीत आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शैक्षणिक क्षेत्राची प्रगती झपाटयाने होऊ लागली. त्यातूनच विद्यार्थी वर्गात हक्कांची जाणीव वाढली. विद्यार्थी वर्ग हा मोठया प्रमाणात संघटित होऊन महाविद्यालयीन समस्या सामाजिक, राजकीय, प्रश्नांवर आपली भूमिका मांडू लागले. १८५० झाली भारतात महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले. १९४६—४७ साली एकूण २.४ लाख एवढे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. गेल्या साडेतीन दशकांमध्ये त्यांची संख्या पंधरा पटीने वाढली आहे. १९९६—९७ साली पदवी, पदविका आणि पदवीच्या आधीचे शिक्षण होणाऱ्या एकूण ६७.५ लाख विद्यार्थ्यांनी विद्यापीठे आणि इतर संस्थांमध्ये प्रवेश घेतला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतातील तरूणांच्या ज्या अनेक संघटना स्वातंत्र्य प्राप्तीच्या उद्‌देशाने निर्माण झाल्या होत्या. त्या विद्यार्थी संघटनांची साध्य प्राप्तीनंतर भूमिका बदलली. स्वतंत्र भारतात अनेक संघटना लुप्त झाल्यातर उर्वरित संघटनांनी राजकीय पक्षांशी नाळ जुळवून स्वत:ला राजकीय विचारांशी जोडून घेतले. त्यामध्ये काँग्रेस सेवादलाची जागा नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (N.S.U.I) ने १९७३ मध्ये घेतली. साम्यवादी पक्षांनी विद्यार्थी स्तरावर All India Students Federation (AISF) १९३६ मध्ये या संघटनेची स्थापना केली. पन्नासच्या दशकात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (AISF) विद्यार्थी संघटना उभारली. अशा अनेक विद्यार्थी संघटनांची स्थापना करण्यात आली. या विद्यार्थी संघटनांच्या चळवळीचा उद्‌देश राजकीय पक्षांचा प्रसार, प्रचार करणे, विचारप्रणाली रूजविणे, नवनेतृत्व तयार करणे या उद्‌दिष्टांची निर्मिती झालेली दिसून येते.

**उद्‌दिष्टये:—**

१) भारतातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर कार्य करणाऱ्या विद्यार्थी संघटनांचा अभ्यास करणे.

२) विद्यार्थी चळवळींचा राजकारण आणि राजकीय पक्षांवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**मुख्य शब्द (Key Words)** — चतु:सूत्री, वसाहतवाद, राजद्रोह, साम्यवाद

**विद्यार्थी संघटनांचा उदय:—**

भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात उच्च शिक्षणाचा फारसा विस्तार झालेला नव्हता. लोकमान्य टिळकांनी 'चतु:सूत्री' कार्यक्रमातून राष्ट्रीय शिक्षणाचा आग्रह धरला. त्यामुळे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लोकमान्य आणि महात्माजी यांच्या आंदोलनात मोठया प्रमाणात विद्यार्थी वर्ग शाळा—महाविद्यालयातून चळवळीत सहभाग झाला. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीला संपूर्ण राष्ट्रीय स्तरावरून विरोध दर्शविण्याचे धाडस विद्यार्थी संघटनांनीच केले. १९७७ मध्ये इंदिरा गांधींना ही आणीबाणी रद्द करून सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा करावी लागली. ही बाब विद्यार्थी संघटनांचा उचित प्रभाव दर्शविणारी मानली जाते.

**१) ऑल इंडिया स्टुटंट्स फेडरेशन :— (AISF)**

ऑल इंडिया स्टुटंट्स फेडरेशन ही पहिली विद्यार्थी संघटना भारत स्तरावरील आहे. या संघटनेची स्थापना ऑगस्ट १९३६ रोजी गंगाप्रसाद मेमोरियल हॉल लखनऊ येथे झाली. या परिषदेचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू आणि एम.ए. जिन्हा होते. १९३६ मध्ये लखनऊ मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी संघाचा जन्म झाला. भारतीय विद्यार्थ्यांना त्यांचा स्वातंत्र्याचा लढा साम्राज्यवाद आणि वसाहतवादाविरूध्दच्या जागतिक संघर्षापासून अलिप्तपणे दिसला नाही. अगदी सुरूवातीच्या काळातही ऑल इंडिया स्टुटंट्स फेडरेशन फॅसिझमच्या विरूध्द सोव्हिएत युनियनच्या नेतृत्वाखालील देशभक्तीवादी सैन्याच्या बलाढय युध्दामागील संपूर्ण शक्तीचा एक भाग होता.

**२) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद** (A.B.V.P)

युवकांची संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीने दिल्लीतील प्राध्यापकांनी ९ जुलै १९४९ ला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची स्थापना केली. परिषदेच्या कार्यात महाविद्यालयीन

शिक्षण घेणारा सुशिक्षित वर्ग होता. या सुशिक्षित वर्गामध्ये स्वतःच्या व्यक्तिमत्वातील गुणांची जाणीव त्याचबरोबर राष्ट्रभक्ती व भारतमातेबद्‌दल प्रेम व कर्तव्याची जाणीव व्हावी व समाजाचे आपणही काही देणे लागतो. ही भावना मनामध्ये निर्माण व्हावी. हा मुख्य उद्‌देश अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेमागे होता.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची स्थापना ९ जुलै १९४९ ला मुंबई येथे झाली. ही एक राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना आहे. ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी साम्य असलेली विद्यार्थी संघटना आहे. तीस लाख वीस हजाराहून अधिक सदस्य संख्या असलेली ही भारतातील मोठी विद्यार्थी संघटना आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विद्यार्थी हितासाठी काम करणारी विद्यार्थी संघटना आहे.

**३) भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघ (N.S.U.I)**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस पक्षाला सतत सत्ता प्राप्त झाली. संपूर्ण भारतीय राजकारण हे काँग्रेस पक्षाभोवती केंद्रित होते. १९४० च्या दशकात ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन नंतर १९६० च्या दशकात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या विद्यार्थी संघटना देशात कार्यरत होत्या. या विद्यार्थी संघटनांप्रमाणेच आपली देखील एक संघटना असावी. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयीन स्तरावर भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेस ही संघटना इंदिरा गांधी यांनी जुलै १९७३ मध्ये स्थापना केली. NSUI ही संघटना विद्यार्थी सक्रियतेची मशाल आहे. जी विद्यार्थी कार्यकर्त्यांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असल्याचे पाहावयास मिळते. विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाची भावना निर्माण करण्याबरोबर विद्यार्थी समाजाच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या कल्पनेने ही मशाल प्रज्वलित आहे. या संघटनेने विद्यार्थी कार्यकर्त्यांना ओळख निर्माण करून दिली. त्यांना तयार केले आणि राष्ट्रांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विविध क्षेत्रातील नेते बनवण्याचे कार्य भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटनेने केलेले आहे.

**विद्यार्थी संघटनांच्या चळवळीची वाटचालः—**

१८५० साली भारतात महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले. १९४६—४७ साली एकूण २.४ लाख एवढे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. स्वातंत्र्य चळवळीच्या निरनिराळया अवस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी फार मोठया संख्येने भाग घेतला. सरकारच्या राजद्रोहाच्या समितीच्या १९१८च्या एका अहवालाप्रमाणे १९०७ ते १९१७ या कालावधीत बंगालमध्ये क्रांतीच्या गुन्हयात अटक झालेल्या एकूण १८६ व्यक्तींपैकी ६८ जण विद्यार्थी होते. भारतातील विद्यार्थी चळवळीचा प्रारंभीचा इतिहास हा जवळजवळ १९२ वर्षापूर्वीचा आहे. विद्यार्थी चळवळीचा प्रारंभ हा १९ व्या शतकात १९२९ मध्ये प्रथम सापडतो. स्वातंत्र्य लढयाला बळ आणि गती मिळाली. ती विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी १९४८ साली जागृती व्हावी यासाठी संघटना तयार करून त्यांना चर्चेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. लॉर्ड कर्झन याने १९०५ साली बंगालची फाळणी केली. त्याच्या विरोधात सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात मोठया प्रमाणात सहभाग घेतला होता. देशाच्या निरनिराळया भागांत आणि वेगवेगळया वेळेला झालेल्या विद्यार्थ्यांच्या चळवळी शैक्षणिक प्रश्नांपासून ते राजकीय समस्यांपर्यत विविध गोष्टींची संबंधित होत्या. विद्यार्थ्यांच्या चळवळी म्हणजे एकूणच सदैव चालू असलेला आर्थिक आणि राजकीय तणाव, समाजव्यवस्थेचे बदलते स्वरूप यांचाच एक भाग आहे. स्वातंत्र्यानंतर भारतातील विद्यार्थी चळवळीपुढे एक नवीन परिस्थिती निर्माण झाली देशाच्या पुर्नउभारणीचे, नोकऱ्यांचे व शिक्षणाचे तसेच देशाचे स्वातंत्र्य टिकवणे, औद्योगिकीकरण व योजनाबध्द विकास याचा आधार घेऊन शिक्षणाच्या क्षेत्रात कोटयावधी लोकांना स्वस्त शिक्षण देण्याची गरज होती. त्यामुळे विद्यार्थी चळवळीने आपले काम सकारात्मक पध्दतीने सुरू ठेवले होते. त्यात विद्यार्थी निवडणुका, विद्यापीठ विधेयक, गोवामुक्ती आंदोलन, पाटणा गोळीबार, धान्यटंचाई विरोधी आंदोलन, तेलंगणाचा लढा अशा राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक प्रश्नांवर विद्यार्थ्यांच्या चळवळी काम करत राहिल्या.

**निष्कर्षः—**

१) विद्यार्थी संघटना विद्यार्थी हितासाठी कार्य करत असताना वेगवेगळया मार्गाचा वापर करत असतात. त्यात निवेदन, मागण्या, आंदोलन, मोर्चा इत्यादि तंत्राचा वापर करण्याचे प्रमाण अधिक आहे.

२) विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी संघटनांचा सहभाग क्रियाशीलपणे आढळतो. त्यामुळे विद्यार्थी संघटनेशी संबंधित युवा नेतृत्व विविध महत्वाच्या पदावर निवडून आलेले आढळते.

३) विविध क्षेत्रात विविध विचारसरणीच्या विद्यार्थी संघटना कार्य करत आहेत. त्यातील काही संघटना कार्य करण्याच्या पध्दतीवरून क्रियाशील वाटतात व काही विद्यार्थी संघटना विद्यार्थी हितासाठी राबविलेल्या उपक्रमांमधून अस्तित्व शिक्षण क्षेत्रात दाखवितात.

**समारोप**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतातील तरूणांच्या ज्या अनेक संघटना स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने निर्माण झालेल्या होत्या. त्या विद्यार्थी संघटनांनी भूमिका साध्य प्राप्तीनंतर बदललेली आहे. स्वतंत्र भारतात अनेक संघटनांनी स्वत:ला राजकीय विचारांशी जोडून घेतले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वीकारलेली संसदीय लोकशाही अनेक अर्थाने विविधता असलेला देश वेगवेगळे हितसंबंध, वाढलेल्या अपेक्षा, स्वीकारलेली कल्याणकारी राज्याची कल्पना आणि आवश्यकता म्हणून जाणीवपूर्वक केलेला शिक्षणाचा विस्तार यामुळे जगातील एक मोठी शिक्षणव्यवस्था भारतात आहे. देशातील विविधतेतून पुढे आलेल्या हितसमुहांचे लहान मोठया अनेक राजकीय पक्षांमध्ये पक्षांतर झाले व प्रत्येक राजकीय पक्ष आपले अधिष्ठान बळकट बनवण्यासाठी क्रियाशील बनला आहे. विचारसरणी, मूल्यव्यवस्था, प्रादेशिक अस्मिता इत्यादींच्या आधारावर राजकीय विचार, आणि विद्यार्थी संघटना यांचे नाते प्रस्थापित होऊन भारतीय राजकारणात विद्यार्थी संघटनांचे जाळे विणले गेले आहे. त्यातून सामाजिक, राजकीय घटकांच्या माध्यमातून नवनेतृत्व निर्मितीला मोठया प्रमाणात चालना मिळालेली आहे.

**संदर्भ**

१) शहा घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स, २०११, पृ. क्रं. १७८, १७९.

२) भालेराव गौतम, डॉ. पवार प्रमोद, विद्यार्थी संघटना आणि राजकारण, अथर्व पब्लिकेशन्स, २०१५, पृ. क्रं. ५५.

३) विद्यार्थी चळवळ, काल आज उद्या — ABS News Marathi.